मुंबई विद्यापीठ

परिपत्रक क्र. टीएएएस(युटी/सीटी)/ ०६/२०१९—२०२०

संदर्भ:—१) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./४८/२००९ दिनांक ३१ जानेवारी २००९
२) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./७३/२०१० दिनांक १६ एप्रिल, २०१०
३) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./५५/२०११ दिनांक १० मार्च, २०११
४) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./९५/२०११ दिनांक ३० मे, २०११
५) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./३७७/२०११ दिनांक ८ नोव्हेंबर २०११
६) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./०१/२०१२ दिनांक २१ जानेवारी, २०१२
७) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./१२/२०१२ दिनांक २८ मे, २०१२
८) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./३७/२०१२ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३
९) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./१५/२०१४—२०१५ दिनांक १५/०९/२०१४
१०) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./८/२०१५—२०१६ दिनांक ०५/१२/२०१५.
११) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक क्र. टीएएएस(युटी/सीटी)/०४/२०१६—२०१७ दिनांक २८/११/२०१६.
१२) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक क्र. टीएएएस(युटी/सीटी)/१०/२०१८—२०१९ दिनांक ०९/०१/२०१९.

**विषय:— संलग्नित महाविद्यालयांत नियमित प्राचार्य नियुक्तीबाबत.**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत मानव्य विद्या, वाणिज्य व व्यवस्थापन, विज्ञान व तंत्रज्ञान तसेच आंतर विद्याशाखा या विद्याशाखांमधील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, आपापल्या महाविद्यालयात प्राचार्यांची पदे प्राधान्याने भरावीत असे विद्यापीठामार्फत उपरोक्त परिपत्रके निर्गमित करुन वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

शासन परिपत्रक क्र. संकिर्ण—२०१७/प्रक्र.१७०/मशि—५ दिनांक २३ एप्रिल, २०१८ अन्वये अशासकीय अनुदानीत महाविद्यालयामध्ये रिक्त असलेली पदे तसेच प्राचार्य पदाचा पाच वर्षाचा कार्यकाल संपुष्टात आल्यानंतर रिक्त होणारी प्राचार्यांची पदे भरण्यासाठी शासनाकडून मान्यता देण्यात आली आहे. मात्र तरीही अनेक महाविद्यालयांमध्ये नियमित प्राचार्य पदाची भरती प्रक्रिया न करता, प्रभारी प्राचार्यांच्या नियुक्तीचे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविले जात आहेत. अशा महाविद्यालयांना वरिल शासन निर्णयानुसार संबंधित सहसंचालकांकडून प्राचार्य पद भरतीकरिता नाहरकत प्रमाणपत्र उपलब्ध करून नियमित प्राचार्यपद भरतीसाठी विहित पद्धतीने प्रस्ताव सादर करण्याकरिता उपरोक्त परिपत्रकामार्फत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० मध्ये व तद्नंतर नवीन महाविद्यालये वगळता इतर महाविद्यालयांमध्ये प्रभारी प्राचार्य पदाचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, असे विद्यापीठ परिपत्रक क्र. टीएएएस(युटी/सीटी)/१०/२०१८—२०१९ दिनांक ०९/०१/२०१९ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

मात्र तदनंतरही अनेक महाविद्यालयांनी नियमित प्राचार्य भरतीसाठी प्रक्रिया सुरू केलेली नाही. त्यामुळे व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत या विषयावर चर्चा करण्यात आली आहे व ज्या महाविद्यालयांमध्ये प्राचार्य पदावर प्रभारी म्हणून काम पहात आहेत अशा महाविद्यालयांचे **नोंदणी व परिक्षा अर्ज** सदर प्रभारी प्राचार्यांच्या स्वाक्षरीने आल्यास ते स्वीकारले जाणार नाहीत असे सर्व महाविद्यालयांना कळवावे असे सुचविले आहे.

त्या अनुषंगाने अशासकिय अनुदानित महाविद्यालयांच्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी संबंधीत सहसंचालकांकडून प्राचार्य पद भरतीकरिता ना–हरकत प्रमाणपत्र उपलब्ध करून नियमित प्राचार्य पद भरतीसाठी यथोचित कार्यवाही करावी त्याचप्रमाणे विनाअनुदानित महाविद्यालयांनीही नियमित प्राचार्य भरण्यासाठी यथोचित कार्यवाही त्वरीत करावी.

उपरोक्त कार्यवाही प्राधान्य क्रमाने करावी, अन्यथा उपस्थित होणाऱ्या अडचणींची जबाबदारी संपूर्णपणे महाविद्यालयांची असेल याची नोंद घ्यावी, ही विनंती.

दूरध्वनी क्र. ०२२–६८३२००५०
ईमेलआयडी – concolsection@gmail.com

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– १९-०६-१९.

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत मानव्य विद्या, वाणिज्य व व्यवस्थापन, विज्ञान व तंत्रज्ञान तसेच आंतर विद्याशाखा या विद्याशाखांमधील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.